Publication: Sakal
Date: 15/1/2020
Page: 3
Column: 1

सकाळ
मुंबई, बुधवार, १५ जानेवारी २०२०

# वीजवाहक तारांशेजारी पतंगबाजी नको!

मुंबई : मकर संक्रांतीचा सण आनंदात साजरा व्हावा यासाठी पतंगप्रेमींनी उच्च दाबाच्या वीजवाहक तारांशेजारी पतंग उडवू नये, असे आवाहन अदानी इलेक्ट्रिसिटीने केले आहे. अशा तारांजवळ पतंग उडवणे जीवघेणे ठरू शकते. यामुळे दुर्घटना झाल्यास मालमत्तेचे नुकसान होईलच; मात्र पॉवर ग्रीडला हानी पोहोचून संपूर्ण शहर काळोखात जाण्याचा धोकाही असल्याचे कंपनीने म्हटले आहे. पतंगासाठी वापरल्या जाणाऱ्या मांजामध्ये धातू असल्याने तो विजेचा सुवाहक मानला जातो. त्याचा विजेच्या तारांना स्पर्श झाल्यास त्यातून सव्वादोन लाख व्होल्टस् एवढ्या दाबाची वीज खाली येऊ शकते. त्यामुळे वर्सोवा, ओशिवरा, गोरेगाव, मालाड, कांदिवली व बोरिवली येथे उच्च दाबाच्या वीजवाहक तारांचे जाळे असल्याने तेथे पतंग उडवणे टाळावे. अशा तारांजवळ कोणी पतंग उडवल्यावर अप्रिय घटना घडल्यास नागरिकांनी १९१२२ या अदानीच्या पॉवर हेल्पलाईनवर संपर्क साधावा, असे आवाहन अदानी इलेक्ट्रिसिटीतर्फे नागरिकांना करण्यात आले आहे.